गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३०६ वा ● बुधवार २७ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 306 | Date : 27/03/2024 blow Wednesday Page 4 Price 4

# महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटप रखडल्याने उमेदवारी याद्या लांबणीवर



मुंबई : लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊन दहा दिवस उलटल्यानंतरही महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीचे संपूर्ण जागावाटप जाहीर झालेले नाही. वंचित बहुजन आघाडीच्या मविआमधील समावेशाचा घोळ सुरू असताना भाजप व शिंदे-अजित पवार गटांमध्येही जागांवरून रस्सीखेच सुरू आहे. जागावाटपानंतर होणाऱ्या संभाव्य बंडखोरीचा प्रतिस्पर्धी आघाडीने फायदा घेऊ नये, यासाठी दोन्ही गटांनी उमेदवारांच्या घोषणेबाबत 'पहले आप'ची भूमिका घेतल्याचे चित्र आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपाचा घोळ गेला महिनाभर सुरू आहे. जागावाटप जाहीर करण्यासाठी रोज नवी तारीख देण्यात येत आहे. आता महायुतीचे चित्र गुरुवारी स्पष्ट होईल, असा नवा मुहूर्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला असला तरी भाजपच्या मनाप्रमाणे जागावाटप झाले तरच गुरुवारी घोषणा होईल, असे भाजपच्या गोटातून सांगितले जात आहे. त्यामुळे आता या दिवशी तरी तिढा सुटणार का, याकडे तिन्ही पक्षांमधील इच्छुक, अन्य नेते व कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीतील पेचही अद्याप सुटलेला नाही. भिवंडी आणि सांगली या दोन जागांवर ठाकरे गट आणि शरद पवार गटाने दावा करून या जागा लढविण्याचे जाहीर केल्याने काँग्रेसमध्ये संतप्त भावना आहे. 'शिवसेना व राष्ट्रवादीने । पान २ वर

# आ.प्रणिती शिंदेंना बळ देणारी बातमी!

## माजी आमदाराचा काँग्रेसमध्ये प्रवेश निश्चित

सोलापूर : काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांच्या विरोधात भाजपने राम सातपुते यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर आता जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. त्याचवेळी काँग्रेससाठी एक दिलासा देणारी बातमी समोर आली असून माजी आमदार दिलीप माने हे काँग्रेसमध्ये परत येणार आहेत. ३१ मार्च रोजी मुंबईत टिळक भवनामध्ये त्यांचा पक्षप्रवेश होणार असून त्यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. दिलीप माने हे दक्षिण सोलापूर मतदारसंघांचे माजी आमदार आहेत. २०१९ साली त्यांनी शिवसेनेकडून प्रणिती शिंदेच्या विरोधात निवडणूक देखील लढवली होती. मात्र त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर मात्र ते शिवसेनेत जास्त सक्रिय राहिले नाहीत.



लोकसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर दिलीप माने हे आपल्या समर्थकसह काँग्रेसमध्ये परतणार असल्याने प्रणिती शिंदेंसाठी ही गोष्ट दिलासा देणारी आहे.

महाविकास आघाडीने सोलापूर मध्य विधानसभा आम्हाला सोडावी, लोकसभा निवडणुकीत आम्ही काँग्रेसचा प्रचार करू असा प्रस्ताव माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी काँग्रेस समोर ठेवला आहे. प्रणिती शिंदेच्या विरोधात निवडणूक लढवलेली असली तरी भाजपा हाच आपला मुख्य विरोधक आहे, त्यांना हरवण्यासाठी आम्ही महाविकास आघाडीला साथ देऊ अशी भूमिका आडम मास्तरांनी घेतलीय. नरसय्या आडम म्हणाले की, आमचे कितीही मतभेद असले तरी आम्ही प्रणिती शिंदे यांच्या प्रचारासाठी तन, मन आणि धन लावून प्रयत्न करू, फक्त त्यानी मध्य विधानसभा मतदारसंघ विधानसभाआम्हाला सोडला पाहिजे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील जवळपास दीड लाख मतदार हे । पान २ वर

# सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार एकाच व्यासपीठावर येणार



पुणे : 'बारामती म्हणजे, पवार आणि पवार म्हणजेच, बारामती' हे गेल्या अनेक दिवसांपासून राज्याच्या राजकारणात रुजलेले समीकरण. काकांचीसाथ सोडून अजित पवारांनी भाजपची साथ दिल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात कोण लढणार? असा प्रश्र्न निर्माण झाला. आणि चर्चा सुरू झाली खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात त्यांचीच वहिनी आणि अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार लढणार असल्याची. बारामतीसाठी महायुतीच्या उमेदवाराचं नाव जरी जाहीर झालं नसलं, तरी राष्ट्रवादीनं लोकसभेसाठी जोरदार तयारी सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. याचपार्श्र्वभूमीवर बारामतीतील वातावरण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच लोकसभेच्या रिंगणात आमने-सामने उभ्या ठाकणार असल्याच्या चर्चा रंगल्यानंतर पहिल्यांदाच विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांची वहिनी सुनेत्रा पवार एकत्र येणार आहेत. बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संभाव्य उमेदवार सुनेत्रा पवार आगामी लोकसभा एकमेकांच्या विरोधात लढवणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. राजकीय वर्तुळात नणंद-भावजयमध्ये रंगणाऱ्या या निवडणुकीच्या चुरशीची जोरदार चर्चा रंगली आहे. अशातच आता पुन्हा राजकीय वर्तुळात या नणंद-भावजयची चर्चा रंगली आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षेत सर्वाधिक गैरप्रकार छत्रपती संभाजीनगर विभागात

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीची परीक्षा घेण्यात आली. त्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत बारावीच्या परीक्षेत गैरप्रकारांचे प्रमाण कमी झाले असून, दहावीच्या परीक्षेत गैरप्रकारांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही परीक्षांमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक गैरप्रकार झाले आहेत. राज्य मंडळातर्फे बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १ ते २६ मार्च या कालावधीत घेण्यात आली. यंदा बारावीच्या परीक्षेत राज्यभरात ३०६ गैरप्रकारांची नोंद झाली.। पान २ वर

# हातकणंगलेत महाविकास आघाडी उमेदवार देणार; 'वंचित'शी बोलणी सुरू : जयंत पाटील



कोल्हापूर : हातकणंगले लोकसभा मतदारसंघात राजू शेट्टी यांना पाठिंबा देण्याची महाविकास आघाडीची तयार आहे. त्यांनी तशी तयारी न दर्शविल्यास येथे आघाडीचा उमेदवार निश्र्चितपणे उतरवला जाईल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी मंगळवारी येथे व्यक्त केले. आमदार जयंत पाटील हे येथील विमानतळावर आले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी राजकीय घडामोडीवर भाष्य केले. ते म्हणाले, सांगलीमध्ये शिवसेनेने उमेदवार जाहीर केला असला तरी त्यातून काही तोडगा निघतो का यावर चर्चा सुरू आहे. माढा येथील जागा रासपचे नेते महादेव जानकर यांना देण्याचा निर्णय पक्षनेते शरद पवार यांनी घेतला होता. त्यांनी त्यास संमतीही दिली होती. ऐनवळी ते महायुतीसोबत गेल्याने येथे दुसरा उमेदवार तयार असल्याचे पाटील यांनी सांगितले.। पान २ वर

# कोळसा उत्पादनानं पार केला १ अब्ज टनचा टप्पा

नवी दिल्ली : गेल्या काही वर्षात वीजेची मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. कोळशाचा साठा कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने देशात अनेकदा वीज टंचाईची समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे कोळसा आयात करावा लागायचा. मात्र, आता दिलासा दोणारी बातमी समोर आली असून मागील काही महिन्यांपासून भारतात कोळशाच्या उत्पादनात वाढ झाली आहे. भारताने कोळसा उत्पादनात १ अब्ज टनाचा टप्पा पार केला आहे. त्यामुळे कोळसा आयातीवरचे अवलंबित्व कमी होणार आहे.

भारत हा जगातील कोळसा उत्पादक देशांपैकी एक आहे. २०२०-२१ मध्ये कोळशाचे उत्पादन ७१६.०८ दशलक्ष मेट्रिक टन होते. त्यानंतर आता चालू आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारताने मागील वर्षाच्या तुलनेत ९३७.२२ दशलक्ष टन कोळसा उत्पादन करत २५ दिवसांच्या फरकाने मागे टाकले आहे. कोळसा उत्पादनात वाढ आणि पुरवठ्यातील कमतरता, यासाठी गेल्या काही वर्षांपासून सरकार काम करत आहे. तसेच आयात कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. कोळसा उत्पादनाच्या देशांतर्गत उत्पादनामध्ये एप्रिल २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत वीज प्रकल्पांमधील आयात कोळशाचा वाटा जवळपास २१ टक्के कमी झाला असून हा टप्पा मागील काही वर्ष जवळपास २२.५ टक्के होता. चालू आर्थिक वर्षात कोळसा उत्पादन एक अब्ज टनाच्यावर जाईल आणि मार्च २०२५ पर्यंत देश स्वयंपूर्ण होईल, असा अंदात व्यक्त केला जात आहे. १ जानेवारीपर्यंत कोळसा कंपन्यांकडे असलेला कोळसा साठा ७०.३७ मेट्रिक टनापर्यंत पोहोचला होता. आता ही वाढ ४७.८५ टक्के वार्षिक वाढ मानली जाते.

# ग्रामीण पोलिसांकडून १३ लाखांची हातभट्टीची दारू नष्ट

सोलापूर/प्रतिनिधी : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी जिल्ह्यातील हातभट्टीच्या ठिकाणांवर व अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. १५ दिवसांत तब्बल १३ लाख सात हजार ५० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील अवैध दारूनिर्मिती व विक्रीवर कारवाई करण्यासाठी विशेष पथके नेमली आहेत. त्यात प्रत्येक पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षकांसह अंमलदारांची पथके आहेत.दुसरीकडे उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी नियंत्रण कक्षातील पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे, करमाळा तालुक्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक कमलाकर पाटील, अक्कलकोट तालुक्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप व पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे पोलिस निरीक्षक बजरंग साळुंखे यांच्या नेतृत्वात विशेष पथके स्थापन केली आहेत. या पथकांनी १५ दिवसांत मुळेगाव तांडा, भानुदास तांडा, गुळवंची तांडा, बक्षिहिप्परगा तांडा, तिल्हाळ, अक्कलकोटमधील तडवळ, भोसगा तांडा, नागूर तांडा, मुंढेवाढी, माळशिरस तालुक्यातील सव्हतगव्हाण, गुरसाळे, श्रीपूर, धर्मपुरी, चव्हाणवाडी आणि करमाळ्यातील शेळगाव, जेऊर, सुगाव, भाळवणी अशा ठिकाणी छापे मारून कारवाई केली. सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या विशेष पथकांनी अवघ्या १५ दिवसांत १३ लाखांहून अधिक रकमेची अवैध हातभट्टी व रसायन नष्ट केले. त्यात ४३० लिटर हातभट्टी व २६ हजार ४५० लिटर रसायन असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. आगामी काळात निवडणूक होईपर्यंत ही विशेष पथके कार्यरत राहणार आहेत.

# प्रभात फेरीच्या माध्यमांतून मतदार जनजागृती

## मतदान जनजागृती साठी संयुक्त उपक्रम




सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवा व नवमतदारांनी उत्स्फूर्तपणे आपला मतदानाचा अधिकार बजाविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय सोलापूर, दयानंद शिक्षणशास्त्र, कला व शास्त्र, विधी महाविद्यालय, डी. ए. व्ही. वेलणकर महाविद्यालय, रोटरी क्लब ऑफ प्राईड सोलापूर आणि डब्ल्यू.ई फॉऊंडेशन, पुणे या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीचे उद्घाटन पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. लोकशाहीला बळकट करण्यासाठी प्रत्येकांनी मतदान करणे आवश्यक आहे. थेंबे थेंबे तळे साचे या उक्ती प्रमाणे मतदान स्वतः पासून सुरुवात करत सर्वांना देशहिताच्या कार्यांत सहभागीं करून घेण्यासाठी महाविद्यालयांचे व विद्यार्थ्यांचे खुप मोठे योगदान असुन हे कार्य विद्यार्थ्यांच्या हातून घडत असल्याचा आनंद कुलगुरु प्रकाश महानवर यांनी प्रभात फेरीच्या उद्घाटनप्रसंगी काढले. तसेच । पान २ वर

# निवडणूकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या उपाययोजना करा : डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार



पुणे : महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने परस्पर समन्वयाद्वारे निवडणुकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि निवडणुका मुक्त आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठीचे नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित पुणे विभागाच्या निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, महसूल उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आदी उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, आदर्श आचारसंहिता आणि भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी निवडणूक आराखडा योग्यरितीने तयार करावा आणि त्यात सूक्ष्म बाबींचाही समावेश असावा. आंतरजिल्हा आणि आंतरराज्य समन्वयासाठीदेखील योग्य नियोजन करावे. पैशाचा आणि बळाचा वापर होऊ नये आणि नागरिकांना निर्भयपणे मतदान करता येईल । पान २ वर

# संपादकीय

## मनसे मर्यादित राहू इच्छिते काय

लोकसभा निवडणुकीसाठीची लगबग सुरू असताना महाराष्ट्रातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या गोटात मात्र कमालीची शांतता होती. त्यामुळे या गडबडीत राज ठाकरे यांचा पक्ष काय निर्णय घेणार या विषयी राजकीय निरीक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. तशातच अलीकडे राज यांनी दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शहा आणि भाजपच्या एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याची भेट घेतल्याची बातमी आली. राज यांची आता महाराष्ट्रातील महायुतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्याच्या बातम्याही लगोलग यायला लागल्या. अजून त्या बाबतचे अंतिम धोरण स्पष्ट झालेले नसले तरी सारा रागरंग राज हे महायुतीच्या दिशेनेच निघाल्याचा आहे. त्यांचा भाजपला किंवा त्यांच्या महायुतीला मोठा प्रासंगिक लाभ होऊ शकतो. कारण उध्दव ठाकरे यांचा झंझावात रोखण्यासाठी त्यांना राज ठाकरे उपयोगी पडू शकतात हे बहुतांशी खरे आहे. पण महायुतीत जाऊन राज यांच्या पदरात काय पडणार हा मात्र एक मोठा प्रश्न आहे. मुळात महायुतीत शिंदे गट, अजित पवार गट आणि भाजप हे तीन मोठे पक्ष असताना त्यांना या चौथ्या पार्टनरची गरजच का भासली हा प्रमुख प्रश्न आहे. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि त्यांच्या मित्र पक्षांनी जो झंझावात निर्माण केला आहे त्यांना रोखणारा प्रभावी नेता महायुतीकडे नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने जणू पक्ष फोडण्याचा चंगच बांधला आहे. मात्र त्यांच्या रणनितीमुळे जनतेच्या मनात भाजपबद्दल कमालीची नाराजी पसरत आहे. अजित पवार, एकनाथ शिंदे यांचा शिवसेना किंवा महाविकास आघाडीला रोखण्याच्या कामात फारसा उपयोग होत नसल्याचे लक्षात आल्यानेच बहुधा आयत्यावेळी या चौथ्या पार्टनरला घेण्याचा प्रयत्न भाजपने चालवला असावा असा याचा अर्थ निघू शकतो. पण आणखी एका पक्षाला आपल्यात ओढून महायुतीत किती खिचडी होणार आहे याचा हिशेब भाजपच्या नेतृत्वाने लावला आहे काय, हा मुख्य प्रश्न आहे. मुळात तीन पक्षांतील जागावाटपाचा तिढा कायम असताना आता पुन्हा मनसेला आपल्यात घेऊन त्यांना नेमक्या किती जागा दिल्या जाणार आहेत हाही प्रश्न आहेच. काही जणांच्या म्हणण्यानुसार केवळ एक-दोन जागा देऊन मनसेची बोळवण केली जाईल. पण मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मात्र राज यांचा भाजपला उपयोग होऊ शकतो त्यासाठीचा हा गेम प्लॅन असावा. मुंबई महापालिका जिंकण्याला भाजपचे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठीची ही योजना असेल तर केवळ तेवढ्यावर मनसे मर्यादित राहू इच्छिते काय हेही पाहावे लागेल.

# निरपेक्ष प्रेमाची भावना म्हणजे 'प्रेम उठाव'


**(पुस्तक परीक्षण लेखक :- राजेंद्र पारे**
**पत्ता : राजगृह ४९/१०५५,चोपडा जि. जळगाव)**

आज सर्वदूर निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. आपली परकी सारेच कसे अनोळखी वाटू लागली. राग, द्वेष, लोभ, एकमेकांचा मत्सर अशा घटना पदोपदी घडत आहेत. हाणामारी, खून, बदला, बलात्कार यासारख्या अनेक गोष्टी आजूबाजूला घडत असणाऱ्या बातम्या वर्तमानपत्र, टीव्हीवर दररोज पाहायला मिळतात. अशावेळी जीवनसंघर्षकार नवनाथ रणखांबे यांचा प्रेमाचा उठाव हा संग्रह प्रकाशित होतोय. ही एक आशादायक घटना आहे असे मला वाटते. कवी नवनाथ रणखांबे आपल्या मनोगतात सांगतात, प्रेम उठाव म्हणजे मानवांच्या प्रेमाच्या विविध रंगछटा, अबोला, विरह, सुख, दुःख,दगा इत्यादी घालमेल व्यक्त करून प्रेमासाठी केलेला उठाव होय.

प्रेम उठाव हा समता व न्याय या सूत्राने बुद्धांच्या अहिंसेच्या मार्गाने जात आहे हे अभिनंदनीय म्हणावे लागेल. 'युद्धाने युद्ध वाढते, प्रेमाने प्रेम' या नियमाने जग वाढले पाहिजे. हिंसाचा समर्थक कोणीही असू शकत नाही पण त्यावर सम्यक उपचार म्हणजे बुद्ध!

प्रेमाचा उठाव या लहानशा संग्रहात पंचवीस चारोळ्या, अकरा कविता आणि दोन गझला असा संमिश्र प्रकार पाहायला मिळतो.

प्रत्येकाच्या आयुष्यात
प्रेम होत असतं
प्रत्येकाच्या तारुण्यात
**कोणीतरी खास असतं (खास/२९)**
किंवा
आषाढाच्या डोळ्यात
तिचा पाऊस दाटला
माझ्या हृदयात
**मीलनाने बेधुंद पडला (बेधुंद/३८)**
किंवा
हृदयाचं नातं




तुझ्या सोबत जोडले
जगाशी नातं
**मी सारच तोडले (नातं/३८)**

कवी पहिल्या प्रेमात एवढा चिंब झाला की तो जगाचा विचार करावा एवढेही त्याच्या मस्तिष्कमध्ये जागा उरली नाही. पहिली ओढ ही दुनियादारी विसरून फक्त आणि फक्त एकमेकांना सामावून टाकणारी ठरते अशीच असते.

प्रेम आंधळं असतं असं सारे जग म्हणतं पण त्यात बुडून जाणं, जगाला विसरू दोन जीवात सारं विश्र्व सामावले आहे असा भास होतो त्यालाच प्रेम म्हणतात का असा प्रश्र्न उभा राहतो.

तू भेटल्यावर एकांतात
पाऊस बघायचा
तू आल्यावर मिठीत
पाऊसही पडायचा (पाऊस/४८)

बेधुंद जगणं म्हणजे प्रेम आणि आपल्याला प्रेयसीला शोधणं तसंच प्रेयसीच्या मनातला भाव शोधत आपलं विश्र्व त्यात लपले आहे का त्याचा शोध घेणे म्हणजे प्रेम असं काही समीकरण मांडण्यात कवी गुंतला आहे. आणि तरल असं भावमय प्रेम गुंफण्यात यशस्वी झाला आहे असे मला वाटतं.

प्रेमाची आस काही कमी होत नसली तरी रोमारोमात असलेली झिंग आयुष्यभर पुरवण्यासाठी कवीची करामत भन्नाट आहे. मन झुरणारं, भेटायला आतुर असलेलं मन वेडं होतं त्याने शेवटी प्रेयसीला आपल्या हृदयात बंद केले.

प्रेम म्हटलं की आस आली तसेच विरहही आलाच. मन चंचल असते त्याला स्थीर राखणं हे कोणाला सहज जमत नाही आणि प्रेमाच्या वाटेवर तर ते अशक्य होतं. दररोज झुरणारं मन प्रेयसीच्या शोधात मग्न असतो अगदी क्षितिज आकाश आणि दाही दिशा हिंडतो पण हाती नैराश्य, दुरावा, जखमा, वेदना आपल्या वाटेवर आलेली पाहून तो बेचैन होतो.

हुंदक्याच्या गाण्याने
शब्द माझे गोठले
वितळून अश्रूने
**ते डोळ्यातून वाहिले (शब्द माझे/३४)**
किंवा
तुझ्यासोबत जगणं
झकास आहे
तुझ्या शिवाय जगणं
**भकास आहे (जगणं/४९)**
किंवा
एका पहाटेने
एक स्वप्न पाहिलेले होते
साकार न होणारे
खोटे विश्र्व दाखवले होते
(खोटे विश्र्व/६०)

टोकाचा निर्णयाला आल्यावर प्रेमविराची गत ही दुःखदायक ठरते. हृदयाची धडधड बंद झाल्यागत त्याची परिस्थिती निर्माण होते.

जगण्याचा झोका
खाली वर येतो
जीवनाला माझ्या
**धडा देऊन जातो ( झोका/६२)**
किंवा
अबोल्याचा उठाव
सांग कुठपर्यंत ?
हृदयाची धडकन
**बंद पडे पर्यंत ! (उठाव/५२)**

विरह, वेदना, अबोला यामुळे प्रियकर वेडापिसा होतो खरा पण त्याला काही मार्ग सुचत नाही म्हणून शेवटी कवीची हालचाली सुरू होतात.


दुःखाचा समुद्र
डोळ्यात दाटल्यावर
टपटपतात टपोरे थेंब
**कविता होऊन कागदावर ( थेंब/४७)**
परत कवीची एक खंत ती अशी की,
हृदयाने माझ्या
खूपच साठवले
लेखणीला मात्र
**थोडेच आठवले (लेखणी/३१)**

कवी नवनाथ रणखांबे यांचा मूळ पिंड बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर विचारधारेला वाहून घेतल्याचा दिसतोय. सामाजिक बांधिलकी म्हणून दिशादर्शक ठरेल असे त्यांच्या लिखाणातून स्पष्ट जाणवते. सामाजिक विषयावर भाष्य करणारे लेखन करावे जेणेकरून ते त्या विषयावर अधिक न्याय देतील. त्याबाबतीत त्यांचे विचार या संग्रहात मिळतात.

बाबांचं बळ आहे जवळ
विचारांची शाळा, प्रगतीचा डोळा
मार्ग सोहळा,फुलला प्रज्ञावंत मळा (भीम बाबा/४२)
भीमराव थोर आम्हा सूर्यासमान आहे
त्यांच्यामुळे आली जगण्यास शान आहे (निळे निशान/३९)

या संग्रहात अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत तसेच रसग्रहण केलेलं आहे तो निम्मा भाग प्रथमच आपल्याला वाचायला मिळेल. यो एक नवीन युक्ती आहे असेच मला वाटते. कवी नवनाथ रणखांबे यांना पुढील लेखनासाठी शुभकामना !

पुस्तक परीक्षण लेखक :- राजेंद्र पारे
पत्ता -: राजगृह ४९/१०५५,चोपडा जि. जळगाव



पुस्तक :- प्रेम उठाव
कवी :- नवनाथ रणखांबे
पुस्तक प्रकाशन :- शारदा प्रकाशन ठाणे

**पान १ वरुन**

## उमेदवारी याद्या लांबणीवर..

आघाडीचा धर्म पाळावा', असा इशारावजा सल्ला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मंगळवारी दिला. वंचितच्या सहभागाचा विषय आता संपल्याचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी जाहीर केले होते. मात्र वंचितला सहभागी करून घेण्यासाठी काँग्रेस आग्रही आहे. असे असताना नुसती जागांची चर्चा न करता लेखी पत्र द्यावे, अशी भूमिका वंचितने घेतली आहे. पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर हे आज, बुधवारी अधिकृत भूमिका जाहीर करतील, असेही स्पष्ट करण्यात आले असून वेगळे लढण्याचे संकेत दिले आहेत. उद्धव ठाकरे गटाची पहिली यादी मंगळवारी जाहीर केली जाईल, असे संजय राऊत यांनी सांगितले होते. मात्र सांगलीवरून निर्माण झालेला तिढा व वंचितबरोबर वाटाघाटींमुळे आता ठाकरे गटाने 'थांबा आणि वाट पाहा' ही भूमिका घेतली आहे. पक्षाची यादी आता आज, बुधवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटांचे एकमेकांच्या हालचालींवर बारीक लक्ष आहे. ठाकरे गटाची यादी जाहीर झाल्यानंतरच शिंदे गट उमेदवारांची घोषणा करण्याची शक्यता आहे. तर शिंदे गटाने विद्यमान खासदारांना तिकीट नाकारल्यास त्यांना दरवाजा उघडण्याची ठाकरे गटाने तयारी केली आहे. शिंदे गटातून परतीचा ओघ सुरू झाल्याचे चित्र निर्माण करण्यासाठी ही रणनीती आखली जात आहे. नेमक्या याच कारणामुळे शिंदे गटाकडून उमेदवारांची घोषणा लांबविली जात असून ठाकरे गटाचे उमेदवार जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा पक्ष आपले उमेदवार जाहीर करण्याची शक्यता आहे.

## आ.प्रणिती शिंदेंना बळ देणारी..

माकपचे सदस्य आहेत. आज देशाचे संविधान धोक्यात आहे, इलेक्टोरोल बॉण्डचा इतका मोठा घोटाळा झाला. त्यामुळे आमचा विरोधक हा भाजप आहे, त्यामुळे सर्व मतभेद विसरून सोलापुरात काँग्रेसला साथ देऊ.सोलापूर लोकसभा मतदारसंघात चुरशीची लढाई होणार, हे आता स्पष्ट झालंय. तीन वेळा आमदार असलेल्या प्रणिती शिंदे आणि २०१९ साली भाजपच्या तिकिटावर आमदार झालेले राम सातपुते यांच्यात ही लढाई रंगणार आहे. राम सातपुते यांची उमेदवारी जाहीर होताच, प्रणिती शिंदे यांनी त्यांचं पत्र लिहून स्वागत केलंय. याच पत्रात त्यांनी सोलापूरच्या लढाईचे रंग कसे असणार आणि त्यात कळीचा मुद्दा काय असणार याचे संकेत दिले आहेत.

## दहावी, बारावीच्या परीक्षेत..

त्यात सर्वाधिक १४२ गैरप्रकार छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळाअंतर्गत झाले. त्या खालोखाल पुणे आणि नागपूरमध्ये प्रत्येकी ६८, लातूरमध्ये २६, नाशिकमध्ये २३, मुंबई आणि अमरावतीमध्ये प्रत्येकी ११, कोकण विभागात ७ गैरप्रकार झाले. कोल्हापूरमध्ये एकही गैरप्रकार नोंदवला गेला नाही. गेल्यावर्षी ३४५ गैरप्रकारांची नोंद झाली होती.यंदा दहावीच्या परीक्षेत एकूण १४० गैरप्रकारांची नोंद झाली. सर्वाधिक ८६ गैरप्रकार छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळात नोंदवले गेले. त्या खालोखाल पुणे मंडळात १९, नागपूर मंडळात १३, लातूरमध्ये १०, नाशिकमध्ये सहा, अमरावतीमध्ये पाच, मुंबईमध्ये एका गैरप्रकाराची नोंद झाली. कोकण आणि कोल्हापूर मंडळात एकही गैरप्रकार नोंदवला गेला नाही. तर गेल्यावर्षी एकूण ११६ गैरप्रकार प्रकरणांची नोंद झाली होती.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की दहावी, बारावीची परीक्षा सुरळीतपणे पार पडली. दोन्ही परीक्षांदरम्यान अडचणी आल्या नाहीत. परीक्षांतील गैरप्रकारांची आकडेवारी पाहता क्षेत्र स्तरावर समुपदेशाचे प्रयत्न वाढवण्याची गरज आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील केंद्रांमध्ये पुढील वर्षी बदल करण्याचा निर्णय घेण्यात येईल. त्यात जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या केंद्रावरील विद्यार्थी संख्या कमी करण्यात येईल.

## हातकणंगलेत महाविकास आघाडी

भाजपच्या ३५ हून अधिक जागा जिंकण्याच्या घोषणेची जयंत पाटील यांनी खिल्ली उडवली. ते म्हणाले, कोल्हापूर आणि साताऱ्याच्या दोन्ही जागा कमी होत असताना दिसत आहेत. यापेक्षा वेगळे वातावरण महाराष्ट्रात नाही. त्यामुळे त्यांच्या घोषणेला काहीही अर्थ नाही. 'वंचित'चे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत बोलणे सुरू आहे. दोन दिवसांत निर्णय अपेक्षित आहे. सातारा लोकसभा मतदारसंघात उदयनराजे भोसले आमच्या संपर्कात नसल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

## प्रभात फेरीच्या माध्यमांतून

कुलगुरू महानवर यांनी विद्यार्थी राष्ट्रीय कामात सक्रिय भूमिका बजावत असल्यामुळे त्यांचे कौतुक केले. या रॅलीसाठी कुलगुरू समवेत सोलापूर विद्यापीठाचे एनएसएस विभागाचे प्रमुख व विद्यापीठाचे संचालक राजेंद्र वडणे , तहसीलदार तथा अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती ओसवाल, श्रीमती भावसार व डब्ल्यू.ई फॉऊंडेशन चे जिल्हा समन्वयक सोमनाथ पवार हे उपस्थित होते.

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य व प्रशासक डॉ. व्ही. पी. उबाळे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे, प्र. प्राचार्य डॉ. एस. जी. गायकवाड आणि रोटरी क्लबचे रोटे. चव्हाण व रोट. उपाध्ये, रोट. उदगिरी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या नोडल ऑफिसर डॉ. एल. व्ही. बामणे व इएलसी क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. रॅलीनंतर बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. मतदान जागृतीसाठी विविध स्पर्धामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना तहसीलदार श्रीमती ओसवाल मॅडमच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले

## निवडणूकीच्या विविध टप्प्यांवर

यादृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात.युवक आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करावे. पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यासोबत मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधण्याविषयी व्यापक जनजागृती करावी. उन्हाळ्यातील वाढते तापमान लक्षात घेता सकाळी आणि सायंकाळी दोन तास मतदानासाठी गर्दी होईल हे लक्षात घेऊन आवश्यक व्यवस्था करावी. उन्हाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील समस्या जाणून घ्याव्यात, असे निर्देशही विभागी आयुक्तांनी दिले.

यावेळी पुणे विभागातील जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे आपल्या जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक कार्यवाहीवर विशेष लक्ष देण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# पोलीस भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ; सरकारची महत्त्वाची घोषणा

मुंबई : राज्यात १७ हजार पोलीस शिपाई भरतीला सुरुवात झाली आहे. या भरतीसाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख होती. पण आता राज्य सरकारने या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ दिली आहे. नव्याने मंजूर झालेल्या मराठा आरक्षणातील डएइउ आरक्षणाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विलंब लागत असल्यामुळे सरकारने ही मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता नव्या आदेशानुसार, उमेदवारांना १५ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. राज्य सरकारने ३१ मार्चपर्यंत असलेली तारीख वाढवून १५ एप्रिल केली आहे. या मुदतवाढीचा फायदा लाखो उमेदवारांना होऊ शकतो. राज्य सरकारने याबाबत प्रेसनोट जारी करत माहिती दिली आहे.

पोलीस भरती २०२३ मधील पोलीस शिपाई संवर्गातील पदांसाठी आवेदन अर्ज केलेल्या उमेदवारांना कळविण्यांत येते की, दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत आवेदन अर्ज सादर करण्याबाबत चरहरळीं यांच्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. राज्य शासनाने नुकतेच मराठा आरक्षण विधेयक संमत केले असून त्याची अंमलबजावणी प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.

अंतिम दिनांकापुर्वी काही उमेदवारांना तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्यास, अशा उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळणेसाठी केलेला अर्जाची पोचपावतींसह आवेदन अर्ज सादर करावा. मात्र कागदपत्र पडताळणीवेळी त्यांचेकडे विहित नमुन्यातील सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे, असंही राज्य सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

राज्याच्या गृह विभागाकडून १७ हजार ७०० पदांच्या भरतीची घोषणा करण्यात आली आहे. या भरतीसाठी ५ मार्च २०१४ पासून ऑनलाईन अर्ज करता येत आहे. येत्या ३० मार्चपर्यंत ही ऑनलाईन अर्जाची मुदत होती. पण हीच मुदत आता १५ एप्रिल करण्यात आल आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर पोलीस भरतीची माहिती देण्यात आली आहे. या माध्यमातून मुंबईत साडेतीन हडार पोलिसांची भरती केली जाणार आहे. यामध्ये २ हजार ५७२ पोलीस शिपाई आणि ९१७ चालक पदांचा समावेश आहे.

**पोलीस भरती साठी अर्ज करण्यास १५ एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून राज्यातील खालील ठिकाणी पोलीस भरती होणार आहे.** १) बृहन्मुंबई आयुक्तालय (२) ठाणे आयुक्तालय (३) पिंपरी-चिंचवड आयुक्तालय (४) मिरा-भाईंदर आयुक्तालय (५) नागपूर आयुक्तालय (६) नाशिक आयुक्तालय (७) नवी मुंबई आयुक्तालय (८) अमरावती आयुक्तालय (९) सोलापूर आयुक्तालय (१०) छ. संभाजीनगर आयुक्तालय (११) लोहमार्ग-मुंबई आयुक्तालय (१२) ठाणे ग्रामीण जिल्हा (१३) रायगड जिल्हा (१४) पालघर जिल्हा (१५) सिंधुदूर्ग जिल्हा (१६) रत्नागिरी जिल्हा (१७) नाशिक ग्रामीण जिल्हा (१८) अहमदनगर जिल्हा (१९) जळगांव जिल्हा (२०) धुळे जिल्हा (२१) नंदुरबार जिल्हा (२२) कोल्हापूर जिल्हा (२३) पुणे ग्रा. जिल्हा (२४) सातारा जिल्हा (२५) सांगली जिल्हा (२६) सोलापूर ग्रा. जिल्हा (२७) छ. संभाजीनगर ग्रा. जिल्हा (२८) जालना जिल्हा (२९) बीड जिल्हा (३०) धाराशिव जिल्हा (३१) नांदेड जिल्हा (३२) लातूर जिल्हा (३३) परभणी जिल्हा (३६) चंद्रपूर जिल्हा (३४) नागपूर ग्रा. जिल्हा (३५) भंडारा जिल्हा (३७) वर्धा जिल्हा (३८) गडचिरोली जिल्हा (३९) गोंदिया जिल्हा (४०) अमरावती ग्रा. जिल्हा(४१) अकोला जिल्हा (४२) वाशिम जिल्हा (४३) बुलढाणा जिल्हा (४४) यवतमाळ जिल्हा (४५) लोहमार्ग-पुणे जिल्हा (४६) लोहमार्ग औरंगाबाद जिल्हा

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील नदीकाठचा विद्युत पुरवठा लवकरच सुरळीत: मा.आ. प्रशांत परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधीःपंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत मा.आ. प्रशांत परिचारक यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. श्री चंद्रकांत दादा पाटील यांना भेटून नदीकाठच्या गावची परिस्थिती सांगितली त्या अनुषंगाने पालकमंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी यांना तात्काळ भीमा नदीकाठचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचे सांगितले



सध्या उजनी धरणातून सोलापूर शहराची पिण्यासाठी पाणी सोडले आहे ते पाणी सोलापूर येथे पोहोचले असून केवळ दोन तास शेती पंपांना वीजपुरवठा करण्यात येतो व नदीकाठच्या गावातील शेतीची पिके उरकळून चाललेली आहेत

सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाची सावट आहे कॅनलला ही पाणी नाही बोरलाही पाणी नाही अशी अवस्थेमध्ये पिके होरपळून चाललेले आहेत करपून चालले आहेत शेतीबरोबर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झालेला आहे

नदीपासून दोन ते तीन किलोमीटर पर्यंत सुद्धा दोन तासाचा विद्युत पुरवठा केला जात आहे त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न मोठा निर्माण झालेला आ

त्यामुळे द्राक्ष ऊस गहू हरभरा मका केळी डाळिंब इत्यादी पिके पाण्याअभावी जळून जात आहे शेतकरी हा अन्नसुरक्षा कायद्यान्वयेतून त्यामुळे शेतकऱ्यांना वीज व पाणी उपलब्ध करून देणे हे बंधनकारक आहे.

पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील नदीकाठच्या विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी सोलापूर जिल्हा पालकमंत्री माना श्री चंद्रकांत दादा पाटील त्यांनी जिल्हाधिकारी यांना सांगून पाण्याचा प्रश्न प्रश्न सोडीत लवकरच होईल त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे

# वटवृक्ष मंदिरातील नियोजनबद्ध दर्शन व्यवस्थेमुळे भाविकांच्या संख्येत वृध्दी : एटीएस चिफ कुलकर्णी

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थांचे देश विदेशासह राज्यभरात अनेक स्वामी भक्त आहेत. वटवृक्ष मंदिरातील भौतिक सौंदर्य येणाऱ्या भाविकांचे मन मोहून घेत आहे. आम्हाला स्वामींचे दर्शन घेण्याकामी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आमच्या मंदिरातील आगमनाची दखल घेऊन तात्काळ स्वामी दर्शनाची उत्तम व्यवस्था उपलब्ध करून दिली. महेश इंगळे साहेबांच्या कृपेमुळे लवकरात लवकर स्वामी दर्शनाचा दुर्मिळ योग लाभला. त्यामुळे मन प्रसन्न झालेले आहे. केवळ आमच्यासाठीच नाही तर येथे येणाऱ्या सर्वसामान्य भाविकांसह अबालवृद्धांसाठी महेश इंगळे हे नियमीतपणे स्वतः वटवृक्षाखाली उभे राहून सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुरळीत व सुलभतेने कसे होईल याकडे जातीने लक्ष देतात. स्वामी दर्शनाकामी कुठल्याही भाविकांना कोणत्याही अडचणींना सामोरे जाण्याचा प्रसंग आल्यास त्यांना तातत्काळ मदतीचा हात देतात. हे आज आमच्या निदर्शनास आले आहे. या निमित्तानेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील नियोजनबद्ध दर्शन व्यवस्थेमुळे स्वामी भक्तांची संख्या वाढत असल्याचे मनोगत दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख अतुलचंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केले ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी अतुलचंद्र कुलकर्णी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन देवस्थान कार्यालयात सपत्नीक सत्कार केला. याप्रसंगी अतुलचंद्र कुलकर्णी बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, इत्यादी उपस्थित होते.



# सैनिक टाकळीचे ऋषिकेश संपत पाटील यांची उपजिल्हा शिक्षणाधिकारीपदी निवड



सैनिक टाकळी/संजय चव्हाणः सैनिक टाकळी येथील ऋषिकेश संपत पाटील यांची उपजिल्हा शिक्षणाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल सैनिक टाकळीमध्ये गावातील माता भगिनींनी ऋषिकेशचे औक्षण करून ऋषिकेश यांचा सत्कार व मिरवणूक काढण्यात आली. यावेळी माझे उपसभापती हरिचंद्र खंडू पाटील (भाऊ) . संजय घेवडे.विजय पाटील.किरण पाटील.एकनाथ पाटील.सोपाण पाटील.संजय पाटील. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होत.सत्कार समारंभ वेळी बोलताना हरिश्र्चंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सैनिक टाकळी मधील नवीन तरुण ऋषिकेश चा बोध घेऊन एम.पी.सी .यू.पी.सी मधून गावातील तरुणांनी असंच गावाचे नाव रोशन करावे असे मनोमन व्यक्त केले

# स्वेरीत ‘इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग’ विभागाचा पालक मेळावा संपन्न






पंढरपूर/प्रतिनिधीः ‘मी अनेक महाविद्यालये पाहून, सर्व बाबी तपासून अखेर माझ्या कन्येला स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश मिळविला. स्वेरीने देखील आम्ही टाकलेला विश्र्वास सार्थ ठरविला. आमच्या पाल्यांमध्ये शिक्षण, शिस्त, आत्मविश्र्वास आणि संस्कार यामध्ये कमालीची प्रगती दिसून येत आहे. एकूणच पाल्यांच्या प्रगतीमध्ये स्वेरीचा सिंहाचा वाटा आहे हे मात्र निश्र्चित! स्वेरीतील शिस्त व संस्कार या गुणामुळे आमचा पाल्य अभियंता घडण्याबरोबरच एक चांगला माणूस म्हणून समाजात नावारूपास येत आहे.’ असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी दिलीप ढाकणे-पाटील यांनी केले. गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या ‘इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग’ या विभागातर्फे ‘पालक मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून दिलीप ढाकणे-पाटील, सचिन बारटक्के व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. योगेश्र्वरी जोशी ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार या पालकांशी संवाद साधताना म्हणाल्या की, ‘पाल्यांच्या जडणघडणीमध्ये पालकांचा देखील महत्वाचा वाटा आहे. म्हणून पाल्यांच्या प्रगतीसाठी पालकांसमवेत सुसंवाद व्हावा या हेतूने ‘पालक मेळाव्या’चे आयोजन केले आहे.’ असे सांगून डॉ. पवार यांनी विभागामध्ये घेतले जाणारे विविध शैक्षणिक उपक्रम, ट्रिपल पीई, इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग स्कीम, नाईट स्टडी, महाविद्यालयाला मिळालेली विविध मानांकने, स्पर्धा परीक्षेची तयारी, प्लेसमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतलेली गरुड झेप, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्राणायम, आर्ट ऑफ लिव्हिंग सारखे प्रशिक्षण आदी बाबत सविस्तर माहिती दिली. प्लेसमेंट विभागाचे प्रा.अविनाश मोटे हे मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या ‘गेट परीक्षा, स्वेरी कॉलेजमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांबद्दल, प्लेसमेंट विभागामार्फत चालणारे कार्य, विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्र्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, संभाषण कौशल्य, सादरीकरण, प्रकल्प, तांत्रिक प्रशिक्षण इंटर्नशीप, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? हे करताना पालकांनी कोणती भूमिका घ्यावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची माहिती पालकांना दिली.


यावेळी नवनाथ फुगारे, सौ. जामदार, सौ.अनुराधा आहिरे, संजय शिंदे, सौ.स्वाती लोटके, सुनील घाडगे, सौ.योगेश्र्वरी जोशी, सचिन बारटक्के यांच्यासह काही पालकांनी आपले विचार मांडले. वसतिगृह व्यवस्थापक प्रा. करण पाटील यांनी ‘स्वेरी अंतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ३ व विद्यार्थिनींसाठी ३ असे स्वतंत्र असलेल्या वसतिगृहाची आजची स्थिती आणि उद्याचे नियोजन यावर अभ्यासपूर्ण माहिती देवून ‘विद्यार्थी व विद्यार्थिनी हे अभियंता म्हणून बाहेर पडत असताना एक चांगला माणूस म्हणून समाजात वावरणे ही काळाची गरज ओळखून त्याप्रकारे स्वेरीतून शिक्षण दिले जात आहे.’ हे सांगितले. यावेळी कोणत्याही परिस्थितीचा बाऊ न करता अभियांत्रिकीची पदवी पूर्ण होण्यापूर्वीच गेट परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या गणेश कचरे व अमोल जाधव यांनी शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत व केलेल्या परिश्रमाबाबत विचार व्यक्त केले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालक मेळाव्यात जवळपास १०० पालक, तसेच विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन प्रा.जे.एस.शिंदे यांनी केले तर डॉ. एन.पी. कुलकर्णी यांनी आभार मानले.

# करमाळ्याच्या तहसीलदारपदी शिल्पा मॅडम ठोकडे

पंढरपूर/प्रतिनिधीः कर्तुत्व हे कोणाकडून उसने मिळत नसते हे स्वकर्तुत्वाने कमवावे लागते मुळातच कर्तुत्वान म्हणजे काय जे कोणी स्त्री आपल्या स्वतःच्या ज्ञानाच्या जोरावर स्वबळावर कोणत्याही स्पर्धेत जीवनाच्या कुठल्याही एका क्षेत्रात सगळ्यात मोठी यशाची शिखर गाठते व त्या यशाची आई वडिलांचे समाजात नाव उज्वल होते आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयाने सामाजिक दृष्ट्या जनतेच्या प्रचंड लाभ होतो आणि समाज त्यांच्याकडे आदराने आणि विनम्रतेने पाहतो माझ्या दृष्टीने कर्तृत्व म्हणतात बहुतेक कर्तृत्व यापेक्षा काही वेगळी नसावी आणि अशाच व्यक्तिमत्त्वांना कर्तुत्वांना म्हणावी

शिल्पा मॅडम सर करमाळा तालुक्यात तहसीलदार म्हणून रुजू झाल्यापासून त्यांचे काम पाहत आहे अतिशय कठोर शिस्तीच्या पण मनात स्वच्छ भावना असलेल्या तहसीलदार मनात आहे

ते बोलून लोकांच्या स्पष्टपणे ऐकून घेऊन त्यातील सत्यता तपासून योग्य तो न्याय देण्याचा कर्तुत्वाने तहसीलदार मॅडम तहसील आवारात न्यायच्या अपेक्षांनी आलेले माणूस खाली हात जाणार नाही याची काळजी मनापासून



घेणाऱ्या तहसीलदार मॅडम लोकांच्या भावना व लोकांचे तळमळ विचारात घेऊन निस्वार्थीपणे काम करणाऱ्या तहसीलदार मॅडम आजही जर एखादा रेबन चा गॉगल टाकला तरी बॉलीवूडची ऑफर येऊ शकते इतकं रॉयल व्यक्तिमत्व असताना सुद्धा आपल्या कामात तेवढाच रुबाब आणि अटीट्यूड जपणाऱ्या डॅशिंगबाज दह्यातील रॉयल तहसीलदार मॅडम

तसं पाहायला गेलं तर सामान्य लोकांचे खूप छोट्या छोट्या गरज असतात रेशन कार्ड चालू नाही रेशनवर धान्य मिळत नाही घरकुलाची कामे इतर कामाची सर्व छोटी-मोठी कामे आपण दोन मिनिटात मार्गी लावतात आता तर सगळ्यात महत्त्वाचा विषय म्हणजे तालुक्यातून कुणबी दाखले प्रोसेसिंग जिल्ह्यात सगळ्यात फास्ट दाखला मिळण्यात सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुका बहुतेक पहिला आहे त्याचे कारण ही तसेच आहे की कित्येक वेळा हे पाहिली ऑफिस रात्री आठ ते नऊ वाजेपर्यंत चालू असतात शिल्पा मॅडम चार खमके नायब तहसीलदार शिलेदार काळजी जाधव गायकवाड लिखित एनीटाईम अवेलेबल आहेत नागरिकांचे हाल गोडसे होऊन नाही म्हणून सगळे सर्कल भाऊसाहेब मोठ्या शिर्केने काम करत आहेत मॅडम सारख्या सर्व कर्मचारी बांधवांनी रात्री बारापर्यंत काम करायची तयारी आहे

सगळ्या करमाळा तालुक्यात माहित झाला आहे की आपण शंभर टक्के या कामाचा तहसीलदार आहात तालुक्याच्या दृष्टीने कुणबी दाखले सुरू झाले आहेत या निमित्ताने भारतातील ट्राय करणाऱ्या मुलींची शाळा कामे किती आत्महत्या देणे व तळमळीने आपण हाताळता आहात हे सगळे थोड्या डोळ्यांनी पाहत आहेत म्हणतात ना कौतुक ते नेहमी योग्य वेळेस व्हायला हवी नाही झालं तर त्याची किंमत शून्य होते

आमच्या शिल्पा मॅडम आहेत या एक खडतर वाट असे किती शक्य करून दाखवणारे अन्यायावर न्याय मिळवून देणाऱ्या ज्या बदलातील समाजाची वय वाढ ज्याच्यामुळे वाढला करमाळ्याचा थाट दाखवतात अति शहाणपणाला कात्रज चा घाट म्हणूनच करमाळा एक दिवस टाकतील त्यांना जेवायला सोन्याचा पाठ ज्यांनी स्वकर्तुत्वावर करमाळाकरांसाठी कामाचा बांधला आहे घाट म्हणूनच सोलापूर जिल्ह्यात एक दिवस येणार आहे शिल्पा मॅडम यांची लाट

आज आमच्या करमाळा करायच्या वर कधी कुठलं संकट आलं तरी आम्ही अजिबात घाबरत नाहीत उलट संकटांना दार उघडून सांगतो वेलकम मित्र स्वागत आहे तुझं पण भावा तू चुकीच्या ठिकाणी आला इथे संकटाच्या छाताडावर पाय देऊन लढणारे आणि संबंध करमाळा तालुक्यातील जनतेसाठी खंबीरपणे उभा राहणाऱ्या तहसीलदार चिरफाड मॅडम ठोकळे राहतात आई कमला भवानी माझ्या मॅडम सरांना चांगला आरोग्य उत्तम एचडी चांगली कामे त्यांच्या हातून होत आहेत अजून त्यांच्या हाताला मॅडम सरांच्या कीर्तीचा ध्वज संबंध महाराष्ट्रभर फडकू दे...

# पंढरपूर सिंहगड मध्ये आदित्य २ के २४ उत्साहात



पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असा कार्यक्रम उत्साहात पार पडला अशी माहिती ड्रॉ प्राचार्य कैलास कारंडे यांनी दिली.या कार्यक्रमाचे उद्घाटन तामिळनाडू येथील संशोधक ड्रॉ रेखा पच पण ड्रॉ कैलास कारंडे प्राचार्य ड्रॉ स्वानंद कुलकर्णी ड्रॉ अतुल आराध्य मेकानिकल इंजिनिअरिंग प्रमुख कुलकर्णी योगेश कांबळे सुधीर शिंदे आदींच्या हस्ते सरस्वती पूजन करून दिपर्जनामध्ये कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली प्रमुख पाहुणे ड्रॉ रेखा पचयनन प्राचार्य डॉ कैलास कारंडे उपप्रचार ड्रॉ आनंद कुलकर्णी प्रा योगेश कांगळे आधी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले. पंढरपूर सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये राष्ट्रीय स्तरावरील आदित्य २के२४मध्ये सोलर सायकल चॅम्पियनशिप इंटरनॅशनल कॉन्फरन्स सोलर वर्क ऑफ सोलर प्रोजेक्ट कॉम्पिटिशन सोलर प्रोजेक्ट आणि सोलर बिजनेस प्लॅन कॉम्बिनेशन अशा सहा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आले होते या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत पंढरपूर परिसरातील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व विजय स्पर्धकांना सन्मानचिन्ह सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी वर्धा बिडकर ऋतुराज बडवे यांनी केले उपस्थित यांचे आभार ड्रॉ अतुल आराधी यांनी मांडले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

# विद्यार्थ्यांनी व्यासंगाची आराधना करावी : पत्की




**मुलींनी गुणवत्ता सिद्ध करावी सीमावर्ती भागातील मुलींची सामाजिक वाटचाल बिकट असते तरी देखील कौटुंबिक स्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, त्यातूनच त्यांची गुणवत्ता सिद्ध होईल असा विश्र्वास आपल्या भाषणातून शांभवी कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.**

अक्कलकोट/प्रतिनिधीः विद्यार्थ्यांनी वाचन चिंतन आणि मनन करत जीवन फुलविले पाहिजे, व्यासंगाची आराधना करत स्वतःच्या व्यक्तिमत्वास आकार दिला पाहिजे, तरच देशाचे भवितव्य उज्वल होईल असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक मुकुंद पत्की यांनी व्यक्त केले.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी हे होते. व्यासपीठावर संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, सेमी विभाग प्रमुख निखील भालेराव आदी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांकडे कल्पकता असली पाहिजे, त्यामुळे नवनवीन प्रयोग करण्याची संधी मिळते.मल्लिनाथ कल्याणशेट्टी यानी म्हणाले की- ध्येय साध्य करण्याच्या हेतूने प्रयत्न केले तर यश हमखास मिळतो. त्यासाठी एकाग्रता असणे आवश्यक आहे.प्रारंभी संस्थेचे संस्थापक पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी वंदन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा व सांस्कृतिक विभागात प्रावीण्य संपादन केलेल्या विदयार्थ्यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. स्वागत प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. गुरुशांत हपाळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. भीम सोनकांबळे, प्रा. शीतल झिंगाडे, प्रा. मनीषा शिंदे, प्रा. रंजना चव्हाण, प्रा. शीतल फुटाणे,प्रा. तुकाराम सुरवसे प्रा. विद्याश्री वाले प्रा. विद्या बिराजदार यांनी प्रयत्न केले.

# लोकसभा निवडणुकिच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाची येत्या गुरुवारी पुण्यात राज्यस्तरीय बैठक

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले मार्गदर्शन करणार

मुंबई /प्रतिनिधीः लोकसभा निवडणुकिच्या प्रार्श्र्वभुमीवर रिपब्लिकन पक्षाची महत्वपूर्ण राज्यस्तरीय बैठक येत्या गुरुवारी दि.२८ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील द लेडीज क्लब,तारापोरे रोड,दस्तुर शाळे जवळ; कॅम्प पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.रिपब्लिकन पक्षाच्या या महत्वपुर्ण बैठकीस रिपाइंचे राज्यातील केंद्रिय पदाधिकारी आणि राज्यकार्यकारिणीचे प्रमूख पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.या बैठकीत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष

केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.लोकसभा निवडणुकिच्या पार्श्र्वभुमीवर रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या राज्यस्तरीय बैठकीकडे सर्व राजकीय धुरीणांचे,राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. या महत्वपूर्ण बैठकीत रिपाइं( आठवले) कोणता निर्णय



घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून राज्यात महायुतीचा घटक पक्ष असताना ही रिपब्लिकन पक्षाकडे जागावाटपात महायतीकडुन दुर्लक्ष झालेले आहे.त्यात भर म्हणुन रिपब्लिकन पक्षाने केलेल्या विरोधाला न जुमानता भाजप ने मनसे ला सोबत घेण्याचा आटापिटा केला आहे.यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या जखमी मनावर मीठ चोळण्याचा जुलुम भाजप करित आहे.या बीकट परिस्थित राज्यभरात अनेक जिल्हात रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपल्या तीव्र भावना समाज माध्यमांवर व्यक्त केल्या आहेत.रिपब्लिकन कार्यकर्त्यांची भावनिकता ओळखुन ना.रामदास आठवले यांनी तातडीने गुरुवार दि.२८ मार्च रोजी रिपब्लिकन पक्षाच्या राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन केले आहे.या बैठकीत लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या जागा वाटपात रिपब्लिकन पक्षाचा वाटा किती?तसेच महायुतीत मनसे ला वाटा दिल्यास रिपब्लिकन पक्षाने कोणती वाट धरायची आणि कोणाची वाट लावायची यावर रिपाइं च्या राज्यस्तरीय बैठकीत विचार विनीमय होणार आहे.लोकसभा निवडणुकीत राज्यात रिपाइं का भूमिका घेणार याची उत्सुकता आहे.त्यामुळे रिपाइंच्या राज्यस्तरीय बैठकीकडे संपुर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# प्रियंका फडतरे यांची बोपगांवच्या सरपंचपदी बिनविरोध निवड

पुरंदर/प्रतिनिधी :स्वाती दिनकर फडतरे यांनी राजीनामादिल्यानंतर रिक्त जागेवर प्रियंका शामराव फडतरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ९ ग्रामपंचायत सदस्य असलेल्या ग्रामपंचायती मध्ये ९ महिला सदस्य आहेत त्या सर्व बिनविरोध निवडून दिलेल्या आहेत.सरपंच निवडीच्या वेळी सर्व सदस्या हजर होत्या.




सौ प्रियंका फडतरे यांची सरपंच पदी निवड झालेंनंतर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी श्री संभाजी झेंडे साहेब माजी सनदी अधिकारी व श्री गंगाराम जगदाळे उपाध्यक्ष : पुणे जिल्हा भा ज प.सौ गौरी ताई कुंजीर महिला.अध्यक्ष : पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस उपस्थित होते. तसेच बोपगांव मधील महिला भगिनी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री भामे भाऊसाहेब मंडल अधिकारी यांनी काम पहिले तसेच सौ राखी ढगारे ग्रामसेविका व श्री कल्पेश कटारे तलाठी भाऊसाहेब यांनी सहकार्य केले.या कार्यक्रम प्रसंगी श्री दयानंद फडतरे,श्री योगेश नाना फडतरे,संदीपभाऊ फडतरे,प्रकाश भाऊ फडतरे, सर्जेराव नाना जगदाळे खंडू नाना फडतरे रामचंद्र सोमा फडतरे विश्र्वास बापु फडतरे,कानिफनाथ बापु फडतरे,साहेब राव फडतरे,कुंडलिक फडतरे, काळुनाना पवार,बाबुसेट फडतरे, विनायक गुरव भाऊसाहेब दगडू फडतरे, तानाजी नारायण फडतरे,बापु अनंत फडतरे, मस्कु फडतरे,बाळासाहेब रा. फडतरे, अशोक दादा फडतरे, बाळू तात्या फडतरे,मारुती,दादा फडतरे, गोरख फडतरे, तानाजी फडतरे, सुरेश फडतरे, दत्तातेय फडतरे,रामदास फडतरे, नंदू भाऊ फडतरे दिनकर उर्फ दादा फडतरे तुकाराम यादव फडतरे,मारुती बापु फडतरे, बाबासाहेब भाऊसो फडतरे इत्यादी ग्रामस्थ बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# आष्टी तलावातील पाणी १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी राखीव

मोहोळ/प्रतिनिधीः मोहोळ तालुक्यात गत पावसाळ्यात पडलेला अत्यंत कमी पाऊस, सध्या सुरू असलेले गावोगावी पाण्याचे दुर्भिक्ष, या पार्श्र्वभूमीवर तालुक्यातील ऐतिहासिक अशा आष्टी तलावातील पाणी केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवल्याची माहिती तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली. हे पाणी १५ जुलै पर्यंत टिकवून ठेवण्याची कसरत प्रशासनाला करावी लागणार आहे. दरम्यान या तलावाच्या माध्यमातून केलेले ३ हजार ६०० एकर बागायत क्षेत्र धोक्यात आले आहे.



मोहोळ तालुक्यातील आष्टी तलाव हा ब्रिटिश कालीन आहे. या तलावाची साठवण क्षमता २३.०१ दशलक्ष घनमीटर आहे. सध्या या तलावात ४९ टक्के पाणीसाठा आहे. या तलावाच्या पाण्यावर एकूण १३ पाणीपुरवठा योजना आहेत. पैकी आठ पाणीपुरवठा योजना सध्या कार्यान्वित आहेत. त्यात माढा, आष्टी, मोडनिंब, तुंगत, येवती, अनगर, रोपळे, खंडाळी या गावांच्या पाणीपुरवठा योजनांचा समावेश आहे. मोहोळ शहरासाठी मंजूर झालेली ४५ कोटी रुपयाच्या पाणीपुरवठा योजनेचे तसेच अनगर व दहा गावे या २०० कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचेही काम सुरू आहे.

दरम्यान शेतकऱ्यांनी विविध बँकांची लाखो रुपयांची कर्ज काढून जलवाहिन्या टाकून आपल्या शेता पर्यंत पाणी आणले आहे. त्यात ऊस, केळी या नगदी पिकासह द्राक्ष, डाळिंब, पेरू, सिताफळ यासह काकडी, टोमॅटो, कलिंगड, खरबूज या वेलवर्गीय पिकांचा व फळभाज्यांचा ही समावेश आहे. सध्या तलाव परिसरातील वीज पुरवठा खंडित केला आहे. दररोज केवळ दोन तास वीज पुरवठा पिण्याच्या पाण्यासाठी सुरू ठेवला जातो. प्रत्येक शेतकऱ्याने कमीत कमी चार ते पाच किलोमीटर जलवाहिन्या टाकून आपल्या शेतापर्यंत पाणी आले आहे. दोन तासांपैकी एक तास तर जलवाहिन्या भरण्यातच जातो, उर्वरित एका तासात किती पाणी मिळणार? काढलेली कर्जे कशी फिटणार? याची काळजी शेतकऱ्यांना लागली आहे.

# अन्नछत्र मंडळाची सर्व क्षेत्रातील कामगिरी उत्कृष्ट

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची धार्मिकतेबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आदी सर्व क्षेत्रातील कामगिरी ही उत्कृष्टच असल्याचे मनोगत मुंबई मंत्रालय येथील समाजकल्याण विभागाचे अवर सचिव पराग वाकडे यांनी व्यक्त केले. येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात वाकडे आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी के.के. आर. क्रिकेट टीमचे प्रशिक्षक ओंकार व आविष्कार साळवी या बंधूंचादेखील सत्कार करण्यात आला. यावेळी संदीप नवले, आकाश मोरे, न्यासाचे सतीश महिंद्रकर, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजी यादव, नामा भोसले, दत्ता माने, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

# मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी आमदार प्रणिती शिंदेंना लोकसभेत पाठवा; सिध्दाराम म्हेत्रे यांचे आवाहन



अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातील प्रश्न गेल्या दहा वर्षांत सुटले नाहीत. हे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार प्रणिती शिंदे यांना लोकसभेत पाठवा, असे आवाहन माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची आखणी करण्यासाठी काँग्रेस कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली होती. त्यावेळी म्हेत्रे बोलत होते. ते म्हणाले, महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे या आक्रमक युवा आमदार असून जनतेचे प्रश्न त्या विधानसभेत पोटतिडकीने मांडतात. जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न लोकसभेत मांडून अर्धवट असणारी कामे पूर्णत्वास नेण्यासाठी आमदार शिंदे यांना मोठ्या मताधिक्क्यांनी विजयी करण्यासाठी जीवाचे रान करावे. विमानसेवेच्या आडून सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडली. पण विमानसेवा सुरू झाली का? चिमणी पाडण्याचे पाप कोणी केले. हे जनतेलापूर्णपणे माहीत असून या लोकसभा निवडणुकीत भाजपला हद्दपार करा, असे आवाहनही त्यांनी केले. आपण आमदारकीच्या काळात अनेक विकासाची कामे केली. सध्या मात्र निधी मंजूर केल्याचा दिखावा केला जात आहे, असे म्हेत्रे यांनी सांगितले.

काँग्रेस पक्षास प्रचारासाठी पैसा उपलब्ध होऊ नये म्हणून बँक खाते गोठविण्यात आली. इलेक्टोरल बॉण्डच्या माध्यमातून भाजपला कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला. केंद्र शासन अनेक सरकारी यंत्रणेवर दबाव आणून विरोधकांना संपविण्याचा डाव रचत आहे. हुकूमशाहीची राजवट मतदारांनी उलथून लावावी असे जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष अशपाक बळोरगी यांनी भाषणात सांगितले. आमदार शिंदे यांना खासदार व सिद्धाराम म्हेत्रे यांना आमदार करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे व जनतेस काँग्रेसने काय काम केले आहे हे सांगावे असे दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी सांगितले. यावेळी जि.प.चे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी दौऱ्यासंबंधी सविस्तर माहिती सांगितली. याप्रसंगी माजी सभापती सिद्धार्थ गायकवाड, आनंद सोनकांबळे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष बाबा पाटील,जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष अरुण जाधव,सैपन सगरी, विश्वनाथ भरमशेट्टी, रवी वरनाळे, सुधीर सोनकवडे, शिवराज पोमाजी, काशीनाथ कुंभार, माजी उपसभापती रामचंद्र अरवत, सिद्धाराम भंडारकवठे, विनीत पाटील, सोमनाथ चिकलंडे, विलास सुरवसे, इरण्णा ढोणे, राजशेखर लकाबशेट्टी, प्रवीण शटगार, शिवानंद बिराजदार, नितीन ननवरे, शशिकांत कळसगोंडा, विश्वनाथ हडलगी, सुनील खवळे आदी उपस्थित होते.

# उल्हासनगर मध्ये पाईप लिकेज असल्याने हजारो लिटर पाणी जाते वाया

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत असलेले रमाबाई आंबेडकर नगरपॅनल क्रमांक सात या ठिकाणी बऱ्याच ठिकाणी पाईप फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया जात आहे मात्र याकडे प्रशासन वॉटर सप्लाय कर्मचारी याकडे दुर्लक्ष केल्याने दिसून येत आहे महाराष्ट्रात पाण्याचा दुष्काळाची टंचाई भासत असून तेच उल्हासनगर मध्ये पाईपलाईन फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असून शिवाय हा रस्ता मोठ्या प्रमाणे रहदारीचा असून या ठिकाणी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे प्रशासन याकडे लक्ष देईल का हेच महत्त्वाचे



# आरटीई प्रवेश मे महिन्यातच! सर्वच शाळांची नोंदणी पूर्ण, आता पुढचा टप्पा शाळांच्या मॅपिंगचा

सोलापूर/प्रतिनिधी : दरवर्षी डिसेंबर- जानेवारीत सुरू होणारी आरटीई प्रवेश प्रक्रिया मार्च संपत आला तरीदेखील सुरू झालेली नाही. आरटीई प्रवेशातील नवीन बदलानुसार सध्या खासगी अनुदानित, अशंतः अनुदानित, विनाअनुदानित, जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकांसह खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची नोंदणी करून घेण्यात आली आहे. त्यानंतर आता सर्व शाळांमधील अंतर (मॅपिंग) नेमके किती आहे, याचे ऑनलाइन मोजमाप होईल. त्यानंतर प्रवेश प्रक्रियेला सुरवात होणार आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून 'आरटीई'अंतर्गत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश मोफत मिळणार नाहीत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून एक किमी अंतरावरील शासकीय किंवा अनुदानित, अशंतः अनुदानित शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किमी अंतरावर शासकीय किंवा खासगी अनुदानित शाळा नाही त्या विद्यार्थ्यांना त्या परिसरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याची मुभा असणार आहे. पण, शाळांच्या मॅपिंगमुळे त्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किमी अंतरावर खरोखरच शासकीय शाळा नाहीत, याची खात्री केली जाणार आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यातील १४ शाळांची नोंदणी अजून झाली नसून त्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यान, 'आरटीई'अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील तीन हजार ३९८ शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून आता या सर्व शाळांचे मॅपिंग होईल. त्यानंतर 'आरटीई'तून प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मागवून घेतले जातील. विद्यार्थ्यांना शाळांचा प्राधान्यक्रम द्यावा लागेल आणि त्यानुसार त्यांना संबंधित शाळांमध्ये प्रवेश मिळतील. प्रवेशाची प्रक्रिया सुरु होण्यासाठी आणखी किमान एक महिन्याचा अवधी लागेल, अशी सद्य:स्थिती आहे. मे महिन्यात प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण होईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले

**तालुकानिहाय शाळांची संख्या**

**तालुका शाळा**

**करमाळा २६५, मंगळवेढा २०७, मोहोळ २६६ , द.सोलापूर २०८, माळशिरस ४५५, पंढरपूर ४१४, माढा ३३९, उत्तर सोलापूर १४७, अक्कलकोट २८९, बार्शी २५०, सांगोला ४१४ सोलापूर शहर १४४ एकूण ३३९८**